अमरावती जिल्ह्यातील तहसिलदार कार्यालय, धामणगांव या कार्यालयीन इमारतीमधील उप अधीक्षक, भूमि अभिलेख कार्यालयाच्या बांधकामास प्रशासकीय मान्यता देण्याबाबत...

महाराष्ट्र शासन
महसूल व वन विभाग
शासन निर्णय क्रमांक: बीएलडी - २०१६/प्र.क्र.२४२/ई-८
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
दिनांक : २१ नोव्हेंबर, २०१७.

संदर्भ:- १) विभागीय आयुक्त, अमरावती विभाग, अमरावती यांचे पत्र क्र. आकाअ/ साप्रवि/जी. बी.- ४/कावि- १०३/२०१६, दिनांक ०६/०४/२०१६.
२) जिल्हाधिकारी, अमरावती यांचे पत्र क्र. कक्ष-२/अ. का./नझुल/कावि-३३५ /२०१६, दिनांक १५/०३/२०१६.

प्रस्तावना:-

संदर्भाधीन पत्रान्वये अमरावती जिल्ह्यातील तहसिलदार कार्यालय, धामणगांव या कार्यालयीन इमारतीमधील उप अधीक्षक, भूमि अभिलेख कार्यालयासाठी २५०० चौ. फुट (२३२.५९ चौमी.) जागेचे बांधकाम करण्यासाठीच्या रु.६७,०७,४००/- खर्चाच्या बांधकामाला प्रशासकीय मान्यता देण्याबाबत प्रस्ताव शासनास सादर करण्यात आला आहे.

२. सदर इमारत बांधकामाचे उपविभागीय अभियंता, उपविभाग धामणगांव यांनी सन २०१५ - १६ च्या जिल्हा दर सुचीवर आधारित रु.६७,०७,४००/- किंमतीचे अंदाजपत्रक तयार केले असून सदर अंदाजपत्रक विभागीय आयुक्त, अमरावती विभाग, अमरावती यांनी दि.०६/०४/२०१६ च्या पत्रान्वये शासनास अग्रेषित केले आहे.

शासन निर्णय:-

अमरावती जिल्ह्यातील तहसिलदार कार्यालय, धामणगांव या कार्यालयीन इमारतीमधील उप अधीक्षक, भूमि अभिलेख कार्यालयाच्या बांधकामाच्या अंदाजपत्रकांची सार्वजनिक बांधकाम विभाग, मंत्रालय, मुंबई यांनी तपासणी केल्यानंतर सदर बांधकामाच्या सहपत्र “अ” मध्ये दर्शविल्याप्रमाणे **रु.७०.८९ लक्ष (रुपये सत्तर लाख एकोणनव्वद हजार फक्त)** च्या खर्चास खालील अटींच्या अधीन राहून शासन प्रशासकीय मान्यता प्रदान करीत आहे:-

अटी व शर्ती-

अ) काम सुरु करण्यापूर्वी जागेच्या मालकी हक्काबाबतची पूर्तता करुन घ्यावी.

ब) ढोबळ स्वरुपात धरण्यात आलेल्या तरतूदीबाबत काम करतेवेळी विस्तृत अंदाजपत्रक दरपत्रके मंजूर करुनच काम हाती घ्यावे.

क) प्रत्यक्ष काम करतेवेळी पर्यावरण विभाग, शासन निर्णय क्र. इएनव्ही-२०१३/प्र.क्र. १७७/तां.क. १, दि. १० जानेवारी, २०१४ मध्ये उल्लेख करण्यात आलेल्या मार्गदर्शक तत्वानुसार कार्यवाही करण्यात यावी.

ड) प्रस्तुत कामाचे नकाशे नस्तीसोबतच्या अंदाजपत्रकात नमूद केल्याप्रमाणे अंदाजपत्रकासोबत जोडण्यात यावेत व त्यावर सक्षम अधिका-याच्या स्वाक्ष-या घेण्यात याव्यात.

२. सदर मान्यता शासन निर्णय, वित्त विभाग, क्रमांक-विअप्र-२०१३/प्र.क्र.-३०/२०१३/विनियम, भाग-२, दिनांक १७/०४/२०१५ मधील भाग- पहिला, उपविभाग-पाच मधील अनुक्रमांक १ नियम क्र.१३४ अन्वये प्रदान केलेल्या वित्तीय अधिकारानुसार मंजूर करण्यात येत आहे.

३. सदर इमारत बांधकामासाठी येणारा खर्च लेखाशिर्ष “मागणी क्रमांक एच-८, ४०५९ - सार्वजनिक बांधकामावरील भांडवली खर्च ०१ कार्यालयीन इमारती ०५१, बांधकाम (२३) भूमि अभिलेख कार्यालये - इमारत बांधकाम (२३)(०१) मोठी बांधकामे ५३ (४०५९ २४६१) (२३) (०२) आस्थापना खर्च) ६३, आंतरलेखा हस्तांतरणे (४०५९ २४७९) (२३) (०३) हत्यारे व संयंत्रे यांचा खर्च हत्यारे व संयंत्र यांचा खर्च (४०५९ २४८८) ६३, आंतरलेखा हस्तांतरणे” या उद्दिष्टाखाली उपलब्ध असलेल्या अर्थसंकल्पीय अनुदानामधून भागविण्यात यावा.

४. सदर कामाची सुरुवात सन २०१७-१८ या आर्थिक वर्षापासून सुरु होत आहे. उक्त लेखाशिर्षाखाली प्रस्तावित बांधकामाचे वर्षनिहाय खर्चाचे नियोजन पुढीलप्रमाणे राहील.-

आर्थिक वर्ष	या आदेशांतील बांधकामाचा अपेक्षित खर्च (रु. कोटी)	उक्त लेखाशिर्षाखाली सुरु असलेल्या इतर कामांसाठी आवश्यक तरतूद (रु. कोटी)	एकूण मंजूर तरतूद (रु. कोटी)
१.	**२.**	**३.**	**४.**
२०१७ - १८	७.०८९	१.५५८१	२.००
२०१८ - १९	२१.२६७	१.१४५२	२.१६
२०१९ - २०	२१.२६७	०.३२५२	२.३३२८
२०२० - २१	२१.२६७	०.००	२.५१९४

५. उक्त लेखाशिर्षाखाली सुरु असलेल्या कामाच्या वित्तीय नियोजनाचा तपशील पुढीलप्रमाणे आहे.-

(रु. हजारात)

अ.क्र.	कामाचे नाव	एकूण अपेक्षित खर्च (रु.)	मागील वर्षाअखेर झालेला खर्च (रु.)	चालू वर्षात अपेक्षित खर्च (रु.)	पुढील वर्षासाठी Carry Forward करावयाची तरतूद (रु.)		
१.	२.	३.	४.	५.	६.		
					अ	ब	क
	महसूल विभागातील २६ भूमि अभिलेख कार्यालयीन इमारतींची बांधकामे	१९.७२९०	१७.०७	१.५५८१	१.१४५२	०.३२५२	०.००

६. सदर शासन निर्णय सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अनौपचारिक संदर्भ क्र.६१/२०१७/इमा-३, दि. १८/०१/२०१७ अन्वये मिळालेल्या सहमतीनुसार निर्गमित करण्यात येत आहे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संगणक संकेतांक २०१७११२०१७२०१४१५१९ असा आहे. सदर शासन निर्णय डिजिटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने.

Nilkanth Pandurang Awhad

Digitally signed by Nilkanth Pandurang Awhad
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Revenue And Forest Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=e42a88b7548c3a7d48b7a77d85de3524cf8f2e7e0f87091223ad803d4d4a2a31, cn=Nilkanth Pandurang Awhad
Date: 2017.11.21 11:36:35 +05'30'

(नि. पां. आव्हाड)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,

१. विभागीय आयुक्त, अमरावती विभाग, अमरावती.
२. जमाबंदी आयुक्त आणि संचालक, भूमि अभिलेख, महाराष्ट्र राज्य, पुणे.
३. जिल्हाधिकारी, अमरावती.
४. महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र - २, नागपूर.

५. महालेखापाल (लेखा परिक्षा), महाराष्ट्र - २, नागपूर.
६. उप अधीक्षक, भूमि अभिलेख, अमरावती विभाग, अमरावती.
७. अधिक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम मंडळ, अमरावती.
८. जिल्हा कोषागार अधिकारी, जिल्हा - अमरावती.
९. उप सचिव, सार्वजनिक बांधकाम विभाग (इमा-३), मंत्रालय, मुंबई - ३२.
१०. सह सचिव, कार्यासन ब-१, महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई-३२.
११. निवड नस्ती, कार्यासन ई-८, महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई - ३२.

(शासन निर्णय क्र. बीएलडी-२०१६/प्र.क्र.२४२/ई-८, दि.२१ नोव्हेंबर, २०१७ चे सहपत्र)

“सहपत्र-अ”

Name of Work: Construction of Administrative building for assistant superintendent taluka bhumi abhilekh, Dhamangaon (Rly)

RECAPITULATION SHEET

Sr. No.	Particulars	Amount Rs.
1)	Construction of Administrative Building (Second floor)	39,54,030/-
2)	Add for Internal Electrical Provisions – 11 %	4,34,943/-
3)	Add for Water supply and Sanitary- 5 %	1,97,702/-
	Total (A)	**45,86,675/-**
4)	Bore Electric Pump	3,00,000/-
5)	Add for Furniture Arrangement – (232.59 X 2500) / M2	5,81,000/-
	Total (B)	**8,81,000/-**
	Total (C)	**54,67,675/-**
6)	Add for probable Price escalation on “C” 10 %	5,46,768/-
7)	Add for Contingencies charges on “C” 4 %	2,18,707/-
8)	Fire Fighting Arrangement	3,00,000/-
	Total (D)	**10,65,455/-**
9)	Add for Cent age Charges – on “D” 5 % on	3,19,352/-
10)	Add 15 % cent age charges on 40 % cost of proper Building	2,37,242/-
	Total (E)	**70,89,744/-**